Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Research Journal

Vidyawarta®

Special Issue February-2018.

श्री बालाजी संस्थान, देऊळगाव राजाद्वारा संचालित

**श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

देऊळगाव राजा, जि.बुलडाणा. पिन-४४३ २०४.

नॅक पुनर्मुल्यांकन 'ब++' दर्जा प्राप्त

# वाणिज्य वार्ता

## विशेषांक

• मुख्य संपादक •

**प्रा.डॉ.विनोद आर.बन्सिले**

वाणिज्य विभाग,
श्री.व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
देऊळगांव राजा, जि.बुलडाणा.
ई-मेल:vinod_bansile@rediffmail.com

14) A PERSPECTIVE STUDY OF MSME IN INDIA
Dr. Gayatri S. Tiwari, Amravati || 54

15) Problems of Indian Agriculture
Dr. J.S.Sawaithul, Amravati || 58

16) CONFLICT BETWEEN A FATHER AND A SON IN CHINUA ACHEBE'S ......
Prof. Deepak Bhagat || 63

17) "A STUDY ON CUSTOMER BEHAVIOR PUBLIC SECTOR BANKING ......
Dr. Jitendra Marotrao Bhalerao, Chaitali Gajanan Gavali || 65

18) Recent Trends in Banking & Insurance Sector
Ku. Jayaprabha M. Bhagat, Wanoja || 70

19) Indian Banking Sector – Challenges and Opportunities
Naval Patil, Amravati. || 73

20) Financial System and it's Role in Indian Economy
Narendra D. Najardhane, Buldhana. || 76

21) INTRODUCATION TO E-COMMERCE
Prof. Dr. Balkrishna S. Ingle || 79

22) GST; IMPACT OF GST AFTER 8 MONTH AND MENTALITY OF.....
Prof. Rupali P Ingle, Malkapur || 82

23) भारताच्या आर्थिक विकासामध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाची भुमिका
प्रा. डॉ. दिलीप का. खुपसे, बाभुळगांव जि. यवतमाळ || 88

24) भारतीय कृषी : आव्हाने आणि संधी
डॉ. राजेंद्र बोरसे, लोणार || 91

25) भारतीय आर्युविमा महामंडळाच्या विविध विमा योजनांकडे ......
प्रा.एन.एच. शेगोकार || 94

26) नियोजन काळातील भारतीय शेतीचा विकास
डॉ. विजय वाकोडे, चिखली. ||99

27) स्वामिनाथन आयोग, शेतकरी कर्जमाफी आणि महाराष्ट्रातील शेती ......
प्रा. ज्ञानेश्वर विष्णू गोरे, देऊळगाव राजा, जि. बुलडाणा. ||102

http://www.vidyawarta.blogspot.com | http://sites.google.com/site/vidyawartajournal

26

# नियोजन काळातील भारतीय शेतीचा विकास

डॉ. मधुकर वाकोडे
सहाय्यक अधिव्याख्याता,
एस. पी. यम. कॉलेज, चिखली.

**********

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. एकुण लोकसंस्थेपैकी अजुनही ६० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. भारताचे एकुण भौगोलिक क्षेत्रफळ ३२८७ लाख हेक्टर आहे. तर वनाखालील क्षेत्रफळ ७१८ लाख हेक्टर म्हणजेच २३.४ इतके आहे. आर्थिक नियोजनाच्या सुरुवातीस एकूण अन्नधान्य उत्पादन ५०८ लाख टन होते, त्यात वाढ होऊन २०१५—१६ मध्ये २५१५ लाख टन इतके झाले यातील वाढ ०५ पटिने झालेली दिसुन येते परंतु लोकसंख्यात ९० कोटीची वाढ झालेली दिसुन येते. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे योगदान हे महत्वपुर्ण असे आहे. देशाच्या राष्ट्रिय उत्पादनात शेतीचा वाटा महत्वाचा आहे तसेच या देशातील वाढीव लोकसंख्येमुळे रोजगार देण्यात काम शेती करीत असते. तसेच अन्नधान्य उपलब्धी, उद्दयोगांना कच्चा माल परकीय चालन प्राप्ती इत्यादी बाबतीत शेतीचे योगदान महत्वाचे आहे. आर्थिक नियोजन काळापासुन अजपर्यंतचा मागोवा घेतल्यास शेती क्षेत्रात मोठया प्रमाणात बदल झालेले दिसुन येतात. लागवडीखालील क्षेत्राफळात अन्नधान्ये आणि बिगर अन्नधान्ये उत्पादनात आणि उत्पादकेतन हरितक्रांतीनंतर आमुलाग्र असे बदल झालेले दिसुन येतात. एकंदरीत नियोजन काळापासुन शेतीचा विकासांचा आलेख वाढता दिसून येत आहे.

**संशोधन विषयाचे उद्दिष्टे:—**

१. नियोजन काळातील शेती व शेतीसंबंधित क्षेत्रावरील खर्चाचा अभ्यास करणे.

२. भारतातील प्रमुख पिकांचे उत्पादन प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

३. नियोजनकाळात भारतातील सिंचनाची प्रगती याचा अभ्यास करणे.

४. भारतातील कृषिमालाची निर्यात याचा अभ्यास करणे.

**अभ्यास विषयाची संशोधन पध्दती :—**

नियाजेत काळातील भारतीय शेतीचा विकास याचा अभ्यास करीत असताना दुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. त्यामध्ये भारताची आर्थिक पाहणी, योजना मासिक, कुरुक्षेत्र व इतर संदर्भ ग्रंथचा आधार घ्येण्यात आला आहे.

**नियोजनकाळातील शेती क्षेत्रातील खर्च:—**

१९५०—५१ पासून आर्थिक नियोजनला सुरुवात झाली. पंचवार्शिक योजनेच्या माध्यमामातून देशाचा आर्थिक विकास घडवुन आणण्याचा विशेष आराखडा तयार केला जात होता. प्रत्येक पंचवार्शिक योजनेमध्ये शेतीचा आणि शेतीसंबंधीचा क्षेत्रात विकास घडवून आणण्यासाठी विशेष तरतूद केली जात होती. पहिला पंचवार्शिक योजनेत शेती क्षेत्राला अग्रक्रम देण्यात आला. या योजनेतील एकूण खर्चापैकी ३१ टक्के वाटा शेती क्षेत्रावर खर्च करण्यात आला. प्रत्येक पंचवार्शिक योजनेत खर्च करण्यात आला आहे. त्याची माहिती पुढील प्रमाणे

**नियोजन काळातील शेती क्षेत्रावरील खर्च (कोटी रुपयात)**

| योजना | पंचवार्शिक योजनेचा कालावधी | एकुण योजना खर्च | शेती क्षेत्रातील खर्च | एकुण खर्चाचे शेती क्षेत्रासाठी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| पहिली पंचवार्शिक योजना | 1951–56 | 1960 | 600 | 31 |
| दुसरी पंचवार्शिक योजना | 1956–61 | 4670 | 950 | 20 |
| तिसरी पंचवार्शिक योजना | 1961–66 | 8580 | 1750 | 21 |
| चौथी पंचवार्शिक योजना | 1969–74 | 15800 | 3670 | 24 |
| पाचवी पंचवार्शिक योजना | 1974–79 | 39430 | 8740 | 22 |
| सहावी पंचवार्शिक योजना | 1980–85 | 109300 | 26100 | 24 |
| सातवी पंचवार्शिक योजना | 1985–90 | 218730 | 47100 | 23 |
| आठवी पंचवार्शिक योजना | 1992–97 | 475480 | 101599 | 21 |
| नववी पंचवार्शिक योजना | 1997–02 | 817000 | 16880 | 20 |
| दहावी पंचवार्शिक योजना | 2002–07 | 1525640 | 305055 | 20 |
| अकरावी पंचवार्शिक योजना | 2007–12 | 3644718 | 136318 | 19.7 |

संदर्भ : रुद्र दत्त आणि सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था

नियोजन काळात शेती क्षेत्रावर जो खर्च करण्यात आला आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्रावरील एकूण खर्चाचे प्रमाण कमी होत गेलेले दिसुन येते. शेतीच्या उत्पादनात आणि उत्पादकतेत तसेच कृषी वृध्दीदरात वाढ झालेली आहे. मात्र शेतकयाच्या आत्महत्येच्या प्रमाणात अधिक प्रमाणात वाढ झालेली आहे. ही एक चिंतेची बाब आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत अन्नधान्ये या पिकांपैकी गहू आणि तांदुळ या पिंकाच्या उत्पादनात आणि उत्पादकतेत वाढ अधिक अधिक दिसुन येते तर कडधान्ये आणि तेलबियांच्या उत्पादकतेतील वाढ कमी आहे. ऊस आणि बटाटा या उत्पादकेतेतील वाढ आधिक आहे. नियोजन काळापासून शेतीच्या विविध क्षेत्रावर खर्च करण्यात आले परंतु म्हणावे तेवढे सिंचनाची राज्यनिहाय विशमता वाढली. हरित क्रांतीनंतर सुध्दा तेलबिया आणि कडधान्याच्या बाबतीत आमुलाग्र बदल झालेला दिसुन येत नाही. मात्र नियोजन काळात शेतीवर जो खर्च करण्यात आला त्यामुळे शेतीचा आणि ग्रामीण भागाचा विकास घडवून येण्यास या योजनाची भुमिका महत्वाची अशीच आहे. हे नाकारत येत नाही.

भारतातील प्रमुख पिकांचे उत्पादन (लाख टनामध्ये)

| प्रमुख पिके | 1950–51 | 1970–71 | 1990–91 | 2010–11 | 2015–16 |
|---|---|---|---|---|---|
| एकुण अन्नधान्ये | 508 | 1084 | 1764 | 2445 | 2515 |
| गहू | 64 | 238 | 551 | 869 | 923 |
| तांदूळ | 205 | 422 | 743 | 960 | 1044 |
| ज्वारी | 63 | 81 | 117 | 70 | 42 |
| मक्का | 24 | 75 | 90 | 217 | 226 |
| बाजरी | 27 | 80 | 69 | 104 | 81 |
| हरभरा | – | – | 54 | 82 | 71 |
| तुर | – | – | 24 | 29 | 26 |
| सर्व कडधान्य | 84 | 118 | 143 | 182 | 164 |
| तेलबिया | 51 | 96 | 186 | 249 | 253 |
| ऊस | 570 | 1264 | 2410 | 3424 | 3484 |
| कापूस | 30 | 48 | 98 | 330 | 300 |
| बटाटा | 17 | 48 | 152 | 423 | 434 |

संदर्भ :— भारताची आर्थिक पाहणी — २०१६—१७ भाग—२

## योजनाकाळात भारतीय सिंचनाची प्रगती

भारतीय शेतीचा आणि ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी सिंचनाची प्रगती होणे आवश्यक आहे. म्हणून पहिल्या पंचवार्शिक योजनेत षेती क्षेत्राला अग्रक्रम देण्यात आला. एकूण योजना खर्चापैकी सिंचनावर २२ : खर्च करण्यात आला आहे. १९५१ ते १९६५—६६ या पहिल्या तीन पंचवार्शिक योजनेत सिंचनाखालील क्षेत्रफळ साधारणता ३०० लाख हेक्टर इतकेच होते. परंतु हरित क्रांतीनंतर सिंचनाचे प्रमाण वाढत गेलेले दिसून येते. १९५१ च्या तुलनेत हरितक्रांतीनंतर सुरुवातीस सिंचनात दुप्पट वाढ झालेली दिसून येते. तांदूळ, गहू, ऊस, बटाटा या पिकांखालील क्षेत्रफाळात वृध्दी झालेली दिसून येते.१९५१ साली सिंचनाखालील क्षेत २५० लाख हेक्टर इतके होते तर दहाव्या पंचवार्शिक योजनेत (२००२—२०१७) सिंचनाचे प्रमाण ८७२ लाख हेक्टर इतके झाले. म्हणजेच आजपर्यंत सिंचनाच्या खालील क्षेत्रफळात चार पटीने वाढ झालेली आहे.

नियोजनकाळांच्या सुरुवातीस उत्तरेकडील भागात हिराकूड आणि भांक्रा नागा ही मोठी धरणे तयार करण्यात आली. त्यामुळे पंजाब व हरियाणा या राज्यातील सिंचनाचे प्रमाण आधिक आहे. वेगवेगळया पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून मोठे, मध्यम आणि छोटे धरणे व पाटबंधारे यांवर मोठया प्रमाणात खर्च करण्यात आले त्यामुळे देशातील इतर राज्यात सिंचनाचे प्रमाण वाढलेले दिसून येते. नवव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी पंजाब राज्यातील सिंचनाचे प्रमाण ९१ :हरियाणा ८५:पश्चिम बंगाल २६:उत्तरप्रदेष ६६:तामिळनाडू ५५ :आंध्रप्रदेश ४४:बिहार ४८:गुजरात ३८:कर्नाटक २६: मध्यप्रदेश २७:ओरिसा ३०:राजस्थान ३६:महाराष्ट्र १७ : इतके सिंचनाचे प्रमाण होते.

| योजना व कालावधी | सिंचन आणि पुरनियंत्रणावरील खर्च (कोटी रुपये) | एकूण खर्चापैकी सिंचनावरील खर्चाचे प्रमाण | विकसित क्षमता | उपयोगात आणलेली सिंचन क्षमता |
|---|---|---|---|---|
| पहिली पंचवार्षिक योजना (1950–1956) | 434 | 22 % | 262 | 250 |
| दुसरी पंचवार्षिक योजना (1956–1961) | 430 | 0.9 % | 290 | 278 |
| तिसरी पंचवार्शिक योजना (1961–1966) | 665 | 0.8 % | 335 | 321 |
| चौथी पंचवार्षिक योजना (1969–1974) | 1354 | 0.9 % | 442 | 418 |
| पाचवी पंचवार्शिक योजना (1974–1978) | 3877 | 10 % | 527 | 484 |
| सहावी पंचवार्शिक योजना (1980–1985) | 10,930 | 10 % | 652 | 588 |
| सातवी पंचवार्शिक योजना (1985–1990) | 16,590 | 09 % | 765 | 685 |
| आठवी पंचवार्षिक योजना (1992–1997) | 31,399 | 07 % | 862 | 772 |
| नववी पंचवार्शिक योजना (1997–2002) | 55,420 | 07 % | 939 | 810 |
| दहावी पंचवार्शिक योजना (2002–2007) | 1,03,315 | 07 % | 1027 | 872 |

संदर्भ :— भारताची आर्थिक पाहणी — २००६—०७

विविध राज्यातील सिंचनाचे प्रमाण याची तुलना केल्यास प्रादेशिक विशमता सिंचनाच्या बाबतीत दिसुन येते सर्वात जास्त सिंचनाचे प्रमाण अनुक्रमे पंजाब, हरियाणा, उत्तरप्रदेश, तमिळनाडु आणि बिहार या राज्याचे आहे. तर सर्वात कमी सिंचनाचे प्रमाण केरळ आणि महाराष्ट्र राज्याचे आहे. देशातील इतर मोठया राज्याशी विचार केल्यास महाराष्ट्र हा ओद्योगिकदुष्टया प्रगत आणि पुढारलेले राज्य म्हणुन ओळखल जात असले तरी सिंचनाच्या बाबतीत बिहारपेक्षा मागासलेले राज्य आहे.देशातील एकंदरीत नियोजन काळापासुन आजपर्यंत सिंचनाच्या आणि शेतीच्या प्रगतीत आमुलाग्र असा बदल झालेला दिसुन येतो. सिंचनाच्या विकासात वाढ झाल्यामुळे शेतीचा विकास आधिक वेगाने झाला. तसेच नगदी पिकांच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**जागतिक निर्यातीमध्ये भारताच्या कृषि मालाचा हिस्सा**

**जागतिक निर्यातीमध्ये भारताच्या काही कृषि मालाचा हिस्सा (प्रमाण टक्केवारीमध्ये)**

| वस्तू | 1980 | 1990 | 2000 | 2010 | 2015 |
|---|---|---|---|---|---|
| तांदूळ | 3.7 | 6.4 | 10.2 | 11.3 | 28.0 |
| अन्नधान्ये निर्मित खादय वस्तू | 0.5 | 0.6 | 1.5 | 3.3 | 6.2 |
| भाजीपाला व फळे | 1.1 | 0.8 | 1.3 | 1.3 | 1.4 |
| चहा | 27.7 | 22.1 | 14.0 | 10.0 | 8.4 |
| मसाले | 14.7 | 7.7 | 10.3 | 15.4 | 17.3 |
| तंबाखू व उत्पादित वस्तू | 4.4 | 0.8 | 0.7 | 2.5 | 2.2 |

संदर्भ :— भारताची आर्थिक पाहणी — २०१६—१७

भारताने नव्वदच्या दशकानंतर जागतिकरणाचा अंगिकार करुन खूल्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल सुरु आहे. मात्र जागतिक बाजारपेठेत भारतीय कृषिमालाचा निर्यातीतील वाटा हा कमी असलेला दिसून येतो. १९८० मध्ये तांदळाच्या निर्यातीतील वाटा ३.७ टक्के इतका होता त्यात वाढ होवून २८. ० टक्के इतका झाला म्हणजेच ९ पटीने वाढ झाली. मसाले आणि चहा याची निर्यात अधिक दिसून येते. जागतिकीकरणानंतर भारतीय कृषि मालाला अनेक स्पर्धांना सामोरे जावे लागते. युरोपीय देशांनी आपल्या गुलाब फुलांची मागणी करीत असतात. भाजीपाला आणि फळे या वस्तूचा निर्यातीतील वाटा अत्यंत कमी आहे. भारतामध्ये कृषि मालाच्या उत्पादनात वाढ झालेली दिसून येते मात्र निर्यातीतील वाटा कमी असलेला दिसून येतो.

**निष्कर्ष :—**

- नियोजन काळात शेती क्षेत्राकडे विशेष लक्ष दिल्यामुळे कृशि क्षेत्राची प्रगती झालेली दिसून येते.
- १९५०—५१ ते २०१५—१६ या कालावधीचा विचार केल्यास एकूण अन्नधान्यात ०५ पटीने वाढ झालेली दिसून येते.
- भारतातील प्रमुख पिक तांदूळ या पिकांत ०५ पटीने वाढ तर गहू या पिकांत १५ : पटीने वाढ आजपर्यंत झालेली आहे.
- १९५०—५१ ते २०१५—१६ या कालावधीचा विचार केल्यास कडधान्ये आणि तेलबियांच्या उत्पादकतेत समाधानकारक वाढ दिसून येत नाही. हरभरा आणि सोयाबिन या दोन पिकांच्या क्षेत्रफळात उत्पादन व उत्पादकतेत सामाधानकारक वाढ दिसून येते.
- हरितक्रांतीनंतर ऊस आणि बटाटा या पिकांच्या उत्पादनात वाढ झालेली आहे. ऊस उत्पादनात ६ पटीने तर बटाटयात २५ पटीने वाढ झालेली दिसून येते.
- नियोजनकाळाच्या सुरवातीचा विचार केल्यास आज भारत हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण देश असून तो काही वस्तूच्या बाबतीत निर्यातक्षम देश बनला आहे.
- योजनाकाळातील सिंचनाची प्रगतीचा विचार केल्यास १९५१ मध्ये २५० लाख हेक्टर सिंचनाखालील क्षेत्रफळ होते. २००७ मध्ये ते ८७२ लाख हेक्टर इतके झाले म्हणजे ०३ पटीने सिंचनात वाढ झालेली दिसून येते.
- जगातील इतर देषाच्या तुलनेत भारत देशातील कृषिमालाच्या निर्यातीमधील वाटा अल्प आहे.
- भारत हा देश कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. कृषि मालाच्या उत्पादन आणि उत्पादकतेत मोठया प्रमाणात वाढ झाली. मात्र जागतिक पातळीवर कृषिमालाची निर्यात ही अंत्यंत कमी असलेली दिसून येते.

**संदर्भ सूची**

➢ India Economic Survey – 2011-12